असा. क्र. ८ रजिस्टर्ड नं. टीईसीएच/४७-३०३/एमबीआय/२००३-०५

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण

**प्राधिकृत प्रकाशन**

**बुधवार, जानेवारी १९, २००५ / पौष २९, शके १९२६**

**स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.**

# भाग चार

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

## अनुक्रमणिका

पृष्ठे

**सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८.**—फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ महाराष्ट्र राज्यास लागू असताना, त्यात आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम . . . . २५-२७

दिनांक १७ जानेवारी २००५ रोजी मा. राष्ट्रपतींनी संमती दिलेला महाराष्ट्र राज्य विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी याद्वारे प्रसिद्ध करण्यात येत आहे.

सचिव,
महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.

## सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८.

(मा. राष्ट्रपतींची संमती मिळाल्यानंतर "**महाराष्ट्र शासन राजपत्रात**" दिनांक १९ जानेवारी २००५ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

**फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ महाराष्ट्र राज्यास लागू असताना, त्यात आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम.**

१९७४ चा २. **ज्याअर्थी,** फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ च्या कलम १६७ च्या पोट-कलम (२) च्या तरतुदींअन्वये, अटक केलेल्या आणि तपास पूर्ण होईपर्यंत, चोवीस तासांपेक्षा अधिक काळ कोठडीत ठेवण्यात आलेल्या आरोपी व्यक्तीस, कोठडीतील आरोपी व्यक्तीची स्थानबद्धता प्राधिकृत करण्याची अधिकारिता असणाऱ्या दंडाधिकाऱ्यासमोर हजर करावे लागते ;

**आणि ज्याअर्थी,** एकतर उक्त पोट-कलम (२) किंवा त्याचे परंतुक यानुसार अभिप्रेत असल्याप्रमाणे कोठडीत ठेवण्याच्या मुदतीत वाढ मिळविण्यासाठी आरोपी व्यक्तींना राज्यातील निरनिराळ्या मध्यवर्ती तुरुंगांमधून किंवा जिल्हा तुरुंगांमधून संबंधित न्यायालयांकडे नेताना आणि तेथून परत आणताना संरक्षक म्हणून सोबत करण्यासाठी फार मोठ्या संख्येतील पोलिसांच्या सेवा घ्याव्या लागतात ;



[ **किंमत** : रुपये ९-०० ]

**आणि ज्याअर्थी,** या प्रयोजनासाठी पोलिसांची मोठ्या प्रमाणात नियुक्ती करूनदेखील, न्यायालयात दंडाधिकाऱ्यासमोर हजर करावयाच्या आरोपी व्यक्तींच्या संख्येत सतत वाढ होत असल्यामुळे अनेक कैदी तुरुंगात ठेवण्याच्या मुदतीत आणखी वाढ मिळविण्यासाठी दंडाधिकाऱ्यासमोर हजर न केले जाता तुरुंगातच राहतात ;

**आणि ज्याअर्थी,** यामुळे पोलीस विभागाच्या दैनंदिन प्रशासनाच्या कामात गैरसोय आणि विस्कळीतपणा देखील निर्माण होतो ;

**आणि ज्याअर्थी,** पोलीस कोठडीमध्ये असलेल्यांहून अन्य आरोपी व्यक्तींना न्यायालयीन कोठडीत ठेवण्याच्या मुदतीत वाढ मिळविण्याच्या प्रयोजनासाठी, इलेक्ट्रॉनिक व्हिडिओ संपर्क यंत्रणेमार्फत संबंधित दंडाधिकाऱ्यांसमोर हजर करणे हाच, ही सततची समस्या सोडविण्यासाठी प्रभावी पर्याय असल्याचे ठरविण्यात आले होते ;

**आणि ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते ;

**आणि ज्याअर्थी,** फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३, महाराष्ट्र राज्यास लागू असताना, यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, त्यात आणखी सुधारणा करण्यासाठी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल महाराष्ट्राच्या राज्यपालांची खात्री पटली होती आणि म्हणून, त्यांनी दिनांक २५ नोव्हेंबर २००४ रोजी फौजदारी प्रक्रिया संहिता (महाराष्ट्र सुधारणा) अध्यादेश, २००४ हा प्रख्यापित केला होता. (१९७४ चा २.) (२००४ चा महा. अध्या. ३४.)

**आणि ज्याअर्थी,** उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रुपांतर करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या पंचावन्नाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, फौजदारी प्रक्रिया संहिता (महाराष्ट्र सुधारणा) अधिनियम, २००४ असे म्हणावे.

(२) तो, दिनांक २५ नोव्हेंबर २००४ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

सन १९७४ चा अधिनियम क्रमांक २ याच्या कलम १६७ ची सुधारणा.

**२.** फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ हा अधिनियम महाराष्ट्र राज्यास लागू असताना, त्याच्या कलम १६७ मध्ये,— (१९७४ चा २.)

(क) पोट-कलम (२) मध्ये, परंतुकामधील परिच्छेद (ख) ऐवजी पुढील परिच्छेद दाखल करण्यात येईल :—

" (ख) कोणताही दंडाधिकारी, आरोपी व्यक्तीची कोणत्याही कोठडीतील स्थानबद्धता, अशा व्यक्तीला त्याच्यासमोर प्रत्यक्ष हजर केल्याशिवाय, या कलमाखाली प्राधिकृत करणार नाही आणि पोलीस कोठडीशिवाय अन्य कोणत्याही कोठडीत ठेवण्याच्या मुदतीत वाढ मिळविण्याकरिता त्या आरोपी व्यक्तीला एकतर प्रत्यक्ष किंवा इलेक्ट्रॉनिक व्हिडिओ संपर्क यंत्रणेमार्फत हजर करता येईल. ";

(ख) स्पष्टीकरण दोन मध्ये, " आरोपी व्यक्तीला दंडाधिकाऱ्यासमोर हजर केले होते " या मजकुराऐवजी " आरोपी व्यक्तीला प्रत्यक्ष किंवा यथास्थिति, इलेक्ट्रॉनिक व्हिडिओ संपर्क यंत्रणेमार्फत, दंडाधिकाऱ्यांसमोर हजर केले होते " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

२००४ चा महा. अध्या. ३४. **३.** (१) फौजदारी प्रक्रिया संहिता (महाराष्ट्र सुधारणा) अध्यादेश, २००४ हा याद्वारे निरसित करण्यात येत आहे. २००४ चा महा. अध्यादेश क्रमांक ३४ चे निरसन व व्यावृत्ती.

१९७४ चा २. (२) अशा प्रकारे निरसन झाले असले तरीही, उक्त अध्यादेशान्वये सुधारणा करण्यात आलेल्या फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ नुसार करण्यात आलेली कोणतीही कृती किंवा कारवाई ही, या अधिनियमाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या उक्त संहितेच्या तरतुदीन्वये करण्यात आलेली कृती किंवा यथास्थिती कारवाई असल्याचे मानण्यात येईल.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई